Vol 5 Issue 6 Dec 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 6 | Dec - 2015

GRT Golden Research Thoughts

# “आशिया खंडातील शांतता प्रक्रियेत भारताची भूमिका महत्त्वाची”

सविता शिवनाथ झुंजारे
संशोधिका, राज्यशास्त्र विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.



सविता शिवनाथ झुंजारे



**प्रस्तावना :-**

आधुनिक कालखंडात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीकोनातून आशियाई क्षेत्र अतिशय महत्वाचे महासत्ताधारी राष्ट्रांच्या दृष्टीकोनातून महत्वाचे बनले आहे. या क्षेत्रावर ज्या राष्ट्रांचे वर्चस्व असेल असे राष्ट्र संपूर्ण जगावर आपल्या साम्राज्याचा विस्तार करेल. असा विश्वास आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक तत्वेत्यांनी व्यक्त केले आहेत. त्या विचाराप्रमाणे या क्षेत्रावर कोणत्या ना कोणत्या महाशक्तीशाली राष्ट्रांनी आपले वर्चस्व ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येते. या क्षेत्रावर प्रथमतः डच, पोर्तुगीज, ब्रिटिश, पुढे साम्यवादी राष्ट्रे आणि आज भांडवलशाही अमेरिकेचे वर्चस्व दिसून येते (१-मुद्रिका प्रसाद, आंतरराष्ट्रीय संबंध, नई दिल्ली, २०१३, पान १३४). अर्थात हे क्षेत्र कोणत्या ना कोणत्या महाशक्तीशाली राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली राहिलेले असल्यामुळे या क्षेत्रातील राष्ट्रे आपला स्वतंत्रपणे सर्वांगीण विकास करु शकले नाहीत. आजही या क्षेत्रातील भारत, चीन वगळता बहुतांशी राष्ट्रे अविकसित दिसून येतात.

दुसऱ्या महायुध्दानंतर आशिया खंडातील काही राष्ट्रात परिवर्तन झाले. परंतु आधुनिकीकरणाच्या दृष्टीकोनातून झालेले दिसत नाहीत. कारण या क्षेत्रातील राष्ट्रे, वसाहतवाद, साम्राज्यवादाच्या नियंत्रणाखाली दीर्घकाळ होती (२-डॉ. रुमकी बासु, संयुक्त राष्ट्रसंघ, सिध्दांत एवं व्यवहार, नई दिल्ली, २०११, पान १२७). १९४५ नंतर या क्षेत्रातील राष्ट्रे हळूहळू स्वतंत्र होऊ लागली. परंतु ही राष्ट्रे राजकीदृष्ट्या महाशक्तीशाली राष्ट्रांच्या नियंत्रणातून मूक्त झाली असली तरी आर्थिक दृष्टीकोन आणि त्यांच्या विचारसरणीपासून स्वतंत्र झालेली दिसत नाहीत. त्यामुळे या खंडातील राष्ट्रांतर्गत शांततेऐवजी अशांतता अधिक दिसून येत आहे. त्यावर उपाय शोधणे कठीण दिसत आहे. कारण विकसित राष्ट्रांचे धोरण आजही या खंडातील राष्ट्रांतर्गत समस्या सोडविण्याऐवजी त्या वाढविण्यावर अप्रत्यक्षपणे भर देत आहेत असेच दिसते. या क्षेत्रात शांतता निर्माण व्हावी, अशा प्रकारचा प्रयत्न विकसित राष्ट्रांनी आजपर्यंत केलेला नाही. उलट ही श्रीमंत राष्ट्रे आम्ही समस्या, वाद, संघर्ष सोडवित आहोत, असे दाखवतात. प्रत्यक्षात तसे आजपर्यंत कधी झालेले दिसत नाही. म्हणूनच भारत-पाकिस्तानमधील काश्मिर प्रश्न, पाकिस्तान-बांग्लादेश यांच्या संघर्ष, पाकिस्तान-अफगाणिस्तान यांच्यातील सीमापार दहशतवादाचा प्रश्न, भारत-चीन सीमावाद, भारत-नेपाळ निर्वासितांचा प्रश्न आजही दिसत आहे (३-विवेक एस. राज, भारतीय विदेश निती, नई दिल्ली, २०११, पान ५६). श्रीलंकेतील तामिळी-सिंहली संघर्षातून भारतीय पंतप्रधानास जीव गमवावा लागला. दहशतवादाची नर्सरी म्हणून पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमेकडे पाहत आहे. यास मदत करणारी राष्ट्रे महाशक्तीशालीच आहेत. परंतु महाशक्तीशाली राष्ट्रांवर अलिकडे दहशतवादी हल्ले होऊनही ही राष्ट्रे दहशतवादी संघटनांचा खात्मा न करता त्यास खतपाणी अप्रत्यक्ष घालत आहे (४-डॉ. कृष्णकुमार रत्तु, आतंक का एक नया चेहरा, जयपूर, २००६, पान २). विकसित राष्ट्रे आपल्या सुरक्षिततेचा विचार करतात. इतरांचा करीत नसल्यामुळे सीमापर धार्मिक

मूलतत्त्वावर आधारित निर्माण झालेला भस्मासूरासारखा दहशतवाद आशियाई राष्ट्रातील जनजीवन विस्कळीत करीत आहे (५-एल. आर. रेड्डी, इनसाईड अफगाणिस्तान एण्ड ऑफ तालिबान नई दिल्ली, २००२, पान ८८). यासाठी भारतासारख्या राजकीय स्थिरता असणाऱ्या लोकशाहीप्रधान देशांनी स्वातंत्र्यापूर्वीपासून या खंडात शांतता निर्माण व्हावी, हेच धोरण स्वीकारल्याचे दिसून येते.

### *आशियातील शांतता प्रक्रियेत भारताची भूमिका :–*

भारताच्या विकासाठी शेजारील राष्ट्रे अधिक शांतप्रिय असणे आवश्यक आहे. त्या राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनप्रणाली उदयास यावी म्हणून भारत सातत्याने स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच प्रयन्तशील राहिला आहे (६-अरुण सहगल / आर. के. स्वहनी, अफगाणिस्तान ए रोल फॉर इंडिया, दिल्ली, २०११, पान १६५). या क्षेत्रातील भौगोलिक रचनेमुळे भारताची सुरक्षा आणि विकास शेजारील राष्ट्रांच्या सुरक्षा व विकासासी जोडलेला आहे. या राष्ट्रांतील राजकीय, आर्थिक, सामाजिक घडामोडीचा परिणाम भारताला सहन करावा लागत आहे. या खंडातील राष्ट्रांना सकारात्मक दृष्टीकोनातून सहकार्य करणारा भारत हा एकमेव राष्ट्र आहे. त्यामुळे भारताने मोठ्या बंधूची भूमिका जबाबदारपणे छोट्या बंधुना सांभाळून घेण्याचे त्यांच्या विकास कार्यास हातभार लावण्याचे कर्य सुरुवातीपासूनच करत आहे (७-डॉ. बी. सिंह गहलौत, भारत की विदेश निति, नई दिल्ली, २००६, पान २०५).




या क्षेत्रातील राष्ट्रांमध्ये राजकीय स्थिरता, स्वच्छ प्रशासन आणि राजकीय शासन यंत्रणा निर्माण व्हावी, यास भारताने प्रथम प्राधान्य दिलेला आहे. त्याकरीता सर्वतोपरी मदतीचे धोरण पंडित जवाहरलाल नेहरुंच्या कालखंडापासून चालत आले आहे. नेहरुंचे परराष्ट्र धोरण, पंचशील तत्त्वे आणि अलिप्त चळवळीच्या माध्यमातून शेजारील राष्ट्रांशी आपले घनिष्ठ संबंध निर्माण करण्यावर भारताने भर दिला आहे (८-शशि शुक्ला, आंतराष्ट्रीय राजनिती, २००७, पान १६४). इंद्रकुमार गुजराल यांचा "गुजराल सिध्दांत" आशियाई राष्ट्रांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करुन इतर राष्ट्रांकडे लक्ष देण्यासाठी कोणतीही अपेक्षा न करता त्यांना मदत करणे. शेजारील राष्ट्रात लोकशाही निर्माण करुन शांतता नांदावी याच अपेक्षेने भारताने सहकार्याचा हात समोर केला आहे (९-ए. के. मिश्रा, दक्षिण एशिया एवं भारत का विकास, २०१२, पान १७८). डॉ. मनमोहन सिंगांनी अफगाणिस्तानात लोकशाही निर्माण करण्यासाठी व त्या राष्ट्रांच्या पुर्नविकासाकरीता केलेला प्रयत्न असो किंवा नरेंद्र मोदी यांना शेजारील राष्ट्रांशी घनिष्ठ संबंध निर्माण करण्यासाठी आपल्या शपथग्रहण सोहळ्याला आशियाई राष्ट्रांतील राष्ट्रप्रमुखांनी दिलेले निमंत्रण असो. हे या क्षेत्रात शांतता नांदावी, या क्षेत्राचा विकास व्हावा, असे भारतास नेहमीच वाटते (१०-हिंदुस्थान टाईम्स्, २६ मे २०१४).

परंतु या क्षेत्रातील वाढत्या धर्मिक मूलतत्त्ववादाचा प्रसार, निरक्षरता, गरीबी, बेकारी, दारिद्र्य आणि उपासमार यासारख्या समस्यांमुळे मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग दहशतवादी संघटनाकडे आकर्षिला जात आहे. यातून दहशतवादी कारवाया होऊन या क्षेत्रातील लाखो लोकांना आपला प्राण गमवावा लागत आहे.

### *आशियातील शांतता प्रक्रियेतील अडथळे :–*

अशा प्रकारच्या दहशतवादी कृत्यास प्रतिबंध घालणे ? भारताच्या शेजारील राष्ट्रांत राजकीय स्थिरता, स्वच्छ प्रशासन आणि लोकशाही शासन यंत्रणा निर्माण करणे यासाठी भारताने आपली भूमिका आजपर्यंत सकारात्मक पध्दतीने बजावत आला आहे. परंतु भारताच्या या भूमिकेला चीन, पाकिस्तानचा पार्ठींबा आजपर्यंत मिळाला नसल्यामुळे या क्षेत्रातील प्रत्येक राष्ट्रांत भारताला शांतता निर्माण करणे कठीण होत आहे. तरीही या क्षेत्रातील राष्ट्रांच्या विकासाकरीता भारताने अलिप्त चळवळ, संयुक्त राष्ट्र संघ आणि विविध सार्कसारख्या प्रादेशिक संघटनांच्या माध्यमातून ज्येष्ठ बंधूची भूमिका बजावत आहे. कारण आशियाई क्षेत्र हे शांततेचे, सहकार्याचे आणि विकासाचे झाल्याशिवाय भारतात शांतता दिसणार नाही (११-कृष्णकांत शुक्ला, भारत और एशियाई देश, २००६, पान १५०) असे भारताला वाटत आहे. याकरीता या खंडात शांतता, विकास आणि लोकशाही निर्माण करुन राजकीय स्थिरता

प्रस्थापित करण्यासाठी भारताची १९४७ पासून आजपर्यंत सकारात्मक दृष्टीकोनातून राहिली आहे.

भारताने आपल्या शेजारील राष्ट्रांतर्गत शांतता व सहकार्याचे वातावरण निर्माण करुन विकासाचे नवे पर्व निर्माण करावे हा उद्देश ठेवून भारत-पाक संबंध, भारत-नेपाळ संबंध, भारत-श्रीलंका संबंध, भारत-मालदीव संबंध, भारत-भूतान संबंध, भारत-बांग्लादेश संबंधावर भर दिला. दक्षिण आशियातील राष्ट्रांतर्गत असणारे वादाचे प्रश्न सोडविण्यासाठी भारत प्रथमतः पुढाकार घेण्याची भूमिका निभावत आला आहे. भारताने बांग्लादेशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न, सुवेझ कालव्याचा प्रश्न असो तसेच भारत-पाकमधील काश्मिरचा प्रश्न असो, नेपाळमधून भारतात येणाऱ्या निर्वासितांचा प्रश्न असो किंवा श्रीलंकेतील तमिळी, सिंहली यांच्यातील निर्माण झालेला संघर्ष असो. त्याचबरोबर मालदीवला भेडसावणाऱ्या वाढत्या पाण्याचा प्रश्न असो. तसेच पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमेवर वाढत असणाऱ्या दहशतवादाच्या नर्सरीचा प्रश्न असो. अशा विविध प्रश्नांचा सामना करण्यासाठी भारताने प्रथमतः पुढाकार घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थात शेजारील राष्ट्रांना आपल्याबरोबर घेऊन विकास करण्याचा मानस ठेवूनच अलिप्त चळवळीचे सदस्यत्व स्वीकारण्यास भाग पाडले. अफगाणिस्तानसारखा देश अलिप्त चळवळीचे सदस्यत्व स्वीकारुन पहिल्या बेलग्रेड अलिप्त चळवळीच्या संमेलनात सहभागी झाला (१२-बी. सी. नरुला, प्रमुख राष्ट्रों की विदेश निती, २०१२, पान ३५१).

भारताने आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर परराष्ट्र धोरण, शांतता, सहकार्य आणि विकासाचे धोरण ठेवून आशियाई राष्ट्रांना लोकशाही विचाराच्या छताखाली आणण्याचा प्रयत्न केला आहे. भारताने असे ठरविले की, शितयुध्द, साम्राज्य, वसाहतवाद, संधीसाधू वृत्तीपासून अलिप्त राहणे पसंद केले. या विचारास शेजारील राष्ट्राने विनाशर्त पाठींबा दिला. भारताने युध्दासाठी पाठींबा दर्शविलेला नसून जागतिक शांततेसाठी नेहमीच शांततावादी राष्ट्रांचे समर्थन करीत आला आहे. विकसित राष्ट्रांच्या युध्दखोर, साम्राज्यवादी, दुटप्पी धोरणास प्रखर विरोध केल्यामुळे ती राष्ट्र स्वतःच्या धोरणात बदल घडवून आणत आहेत (१३-आर. एस. यादव, भारती की विदेशी निती एक विश्लेषण, २००२, पान ३२१). आज जगातील प्रत्येक राष्ट्र भारताकडे एक शांतीप्रिय लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष, विकसित देश म्हणून पाहत आहेत.

७ डिसेंबर १९८५ पासून आशिया क्षेत्रातील विकासाच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडून आलेला आहे. त्याचे श्रेय बांग्लादेशाचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष झिया-ऊर-रहमान यांना दिले जात असले तरी भारताने त्यांच्या विचाराचे समर्थन करुन पाठींबा दर्शविल्यामुळे झिया-ऊर-रहमान यांनी मांडलेल्या प्रादेशिक सहकार्य संघटनेचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी भारत पुढाकार घेऊन सर्वाधिक आर्थिक खर्चाचा हिस्सा स्वीकारल्यामुळे दक्षिण आशियाई क्षेत्रातील प्रादेशिक सहकार्यासाठी निर्माण करण्यात आलेली सार्क संघटना १९८५ रोजी अस्तित्वात आली (१४-शशि शुक्ला, आंतराष्ट्रीय संघटन, २००६, पान ३३१). या संघटनेमुळे आशियातील राष्ट्रे आपले मतभेद विसरुन एका व्यासपीठावर येऊन या क्षेत्रातील उद्भवणाऱ्या समस्येवर सामूहिकपणे उपाय करण्यासाठी एकमत होताना दिसून येतात.




आशिया क्षेत्रातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत करण्याचे काम धार्मिक मूलतत्त्ववादी, दहशतवादी संघटना करीत आहेत. ही समस्या सारख्या प्रमाणात सार्क सदस्य राष्ट्रांना भेडसावत आहे. या क्षेत्रात पर्यावरण, आरोग्य, बेकारी, दारिद्र्य, उपासमार यासारख्या समस्या समान प्रमाणात दिसत आहे. त्याचबरोबर स्वार्थी वृत्ती, असुरक्षितता, अस्थिर शासन व्यवस्थेने या क्षेत्रातील नागरिकांचे जीवन संकटमय बनले आहे. आशियाई क्षेत्र हे अशांतता, असुरक्षिततेचे बनले असल्यामुळे भारताने पुढाकार घेतल्याशिवाय हे क्षेत्र शांतता व विकासाचे दिसणार नाही. भारताच्या विकासाकरीता आशियात शांतता निर्माण होणे आवश्यक आहे, हे ओळखून भारताने पुढाकार घेतलेला दिसतो.

### *लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार :-*

आशियाई क्षेत्रात शांतता व सहकार्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी भारताने प्रथमतः सार्क राष्ट्रांमध्ये लोकशाही

विचाराचे शासन निर्माण करण्यावर अधिक भर दिला आहे. आज श्रीलंका, नेपाळ, मालदीव, भूतान, अफगाणिस्तान, पाकिस्तानसारख्या लष्करी शासन व्यवस्था स्थापन करणाऱ्या सर्व राष्ट्रांत भारताच्या पुढाकाराने लोकशाही शासन व्यवस्था अस्तित्वात आली आहे. या क्षेत्रातून भारताच्या पुढाकारातून लष्करशाही, राजेशाही राजवटी नष्ट होवून लोकशाही शासन व्यवस्था निर्माण करण्यात आली.

### *दहशतवाद संपवण्याचा सामूहिक प्रयत्न :—*

दहशतवाद ही समस्या अलिकडील काळात फार मोठ्या प्रमाणात वेगाने प्रसारित झाली. त्यामुळे ही समस्या संपूर्ण जगाला काळीमा फासणाऱ्या भस्मासूरासारखी उदयास आली आहे. आज प्रत्येक देशात दहशतवादाचा उगम झाला. त्यामुळे ही समस्या नष्ट करण्यासाठी प्रत्येक देश त्या विरोधात कारवाया करीत आहेत. दहशतवाद ही समस्या मानवी जीवनाला काळीमा फासणारी आहे. त्यामुळे एका राष्ट्राने दहशतवादाचा मुकाबला केल्यास दहशतवाद संपणार नाही. यासाठी सामूहिक प्रयत्नाची गरज आहे, असे भारतीय नेत्यांनी वेळोवेळी आपले मत मांडले आहे. भारताने दहशतवादाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची दया करीत नाही. दहशतवादास दोषी ठरवून फासावर लटकविले जाते. अजमल कसाब, अफजल गुरु यांना दोषी ठरवून फासावर लटकविले. दहशतवादा संदर्भात भारत जसा ठोस पावले उचलतो तशा प्रकारचे पाऊल सार्क सदस्य राष्ट्रांनी उचलणे आवश्यक आहे. आज भारताच्या पुढाकारामुळे भारत–अफगाण सीमेलगत वाढत असणाऱ्या दहशतवादास आळा बसत आहे. काश्मिरमधील दहशतवादी कारवाया रोखण्याचे काम भारत करीत आहे. संघर्षाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा सातत्याने प्रयत्न स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत करीत आला आहे. अस्थिर असणाऱ्या राष्ट्रांना स्थिर बनविण्यासाठी भारताचा महत्त्वाचा वाटा आहे.

### *विकासाकरीता सामूहिक प्रयत्न :—*

सार्क देशातील विविध क्षेत्रात अनेक समस्या निर्माण होत असल्या तरी सार्क व्यासपीठावरुन ते सोडविण्याचा प्रयत्न सार्क राष्ट्रे करत आहेत. त्यात भारताची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. भारताने सार्क संघटनेच्या कार्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा सर्वाधिक आर्थिक सहकार्याचा वाटा उचलला आहे. शिक्षणासाठी सार्क विद्यापीठाची स्थापना भारताची राजधानी दिल्ली येथे केली आहे.

### *शांती कार्यातील भारताचे यश :—*

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात शांततेला अधिक प्राधान्य देऊन कोणत्याही उद्भवलेल्या समस्येला वाटाघाटीद्वारे प्रयत्न करुन सोडविलेले आहे. हे काम पंडित नेहरुंच्या कालखंडापासून ते राजीव गांधींच्या कालखंडापासून सुरु आहे. त्यामुळे लालबहाद्दूर शास्त्री यांचा शांतता प्रक्रियेतच ताश्कंद येथे मृत्यू झाला. श्रीलंकेतील सिंहली–तमिळी वाद सोडविण्यासाठी राजीव गांधीने पुढाकार घेतला. त्यामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला. तरीदेखील भारताच्या सध्याच्या पंतप्रधानांनी शांततेची भूमिका निभावत आहेत. आज भारत–पाकिस्तान संबंध नरेंद्र मोदी विरुध्द नवाब शरीफ बिघडले असताना देखील नरेंद्र मोदी यांनी (१५–नवभारत टाईम्स, २ डिसेंबर २०१५) प्रथम नवाब शरीफ यांना मैत्रीचा व शांततापूर्ण सहकार्याचा हात दिला आहे. त्यामुळे आज भारताच्या शेजारील राष्ट्रांत शांततापूर्ण लोकशाहीचे वारे वाहत असताना कांहीअंशी प्रमाणात अडथळे येतात. या क्षेत्रातील वाढत्या धार्मिक मूलतत्त्वाचा प्रसार, गरीबी, बेकारी, निरक्षरता आणि उपासमार यासारख्या समस्यांमुळे मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग दहशतवादी संघटनांकडे आकर्षिला जात आहे. यातून दहशतवादी कारवाया होवून लाखो लोकांना प्राण गमवावे लागत आहे.

### *सारांशरुपाने :—*

भारताने प्रारंभिक कालखंडापासून आपल्या परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेमध्ये शांतता, परस्पर सहकार्य अहस्तक्षेप अलिप्तता यास अधिक प्राधान्य देवून आपल्या राष्ट्राचा त्याचबरोबर शेजारील राष्ट्रांच्या विकासकार्यात हातभार लावण्याचे जे धोरण स्वीकारले त्याच धोरणाचा स्वीकार करीत भारत १९४७ पासून आजपर्यंत नेहरुंच्या धोरणाचा महात्मा गांधीजींच्या अहिंसेचा, लाल बहाद्दूर शास्त्रीच्या वास्तववादाचा अंगीकार करुन आपले धोरण निश्चित केले आहे. मूळच्या परराष्ट्र धोरणातील महत्त्वाचा गाभा आजच्या भारत सरकारने सोडलेला नाही. भारताने दक्षिण आशियातील शांततेच्या प्रक्रियेतील महत्त्वाची भूमिका बजावत असला तरी ही समस्या आता आशिया क्षेत्रापूरती मर्यादित राहिली नसून ती जागतिक बनल्यामुळे भारताने जगातील सर्व राष्ट्रप्रमुखांना विनंती करीत आहे की, जगात उद्भवणाऱ्या सर्व समस्यांपैकी दहशतवाद आणि पर्यावरणासारख्या समस्या संपूर्ण मानवी जीवन उध्दवस्त करणाऱ्या आहेत. अशा समस्यांचा सामूहिकपणे मुकाबला केल्यास जागतिक पटलावरुन या समस्या नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. त्यासाठी अशा समस्यांचा मुकाबला करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडे विदेश दौऱ्यावर भर देवून जागतिक समस्येकडे विकसित राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांचे लक्ष वळवित आहेत आणि आपले विचार त्यांच्या व्यासपीठावर उभे राहून व्यक्त करतात की, वाईट कृत्य करणाऱ्या राष्ट्रांचा विरोध भारत सदैव करेल. असे सांगून न थांबता नरेंद्र मोदी स्वतः पुढाकार घेऊन दोन्ही राष्ट्रांचे (भारत– पाकिस्तान) बिघडलेले संबंध मैत्री रुपात करण्यासाठी मवाळ भूमिका स्वीकारुन आपलाच हात शांततेसाठी प्रथम नवाब शरीफ यांच्या हातात देऊन शांततेच्या दिशेने वाटचल करण्याचा मार्ग स्वीकारला. म्हणून आशियातील शांतता प्रक्रियेत भारत सदैव शांततापूर्ण सहकर्याची भावना बजावताना दिसते.



अशा प्रकारचे सहकार्य येणाऱ्या काळातही करतील, अशी आशा बाळगणे भारतासह सर्व आशिया खंडातील राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांच्या निर्णय प्रक्रियेवर अवलंबून आहे.

*संदर्भ ग्रंथ*

१.मुद्रिका प्रसाद, आंतरराष्ट्रीय संबंध, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१३, पान १३४.
२.डॉ. रुमकी बासु, संयुक्त राष्ट्रसंघ, सिध्दांत एवं व्यवहार, जवाहर पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, २०११, पान १२७.
३.विवेक एस. राज, भारतीय विदेश निती, सिव्हील सर्व्हिसेज टाईम्स्, नई दिल्ली, २०११, पान ५६.
४.डॉ. कृष्णकुमार रत्तु, आतंक का एक नया चेहरा, बुक एनक्लेव, जयपूर, २००६, पान २.
५.एल. आर. रेड्डी, इनसाईड अफगाणिस्तान एण्ड ऑफ तालिबान इरा, एपीएच. पब्लिशिंग कॉर्पोरेशन, नई दिल्ली, २००२, पान ८८.
६.अरुण सहगल / आर. के. स्वहनी, अफगाणिस्तान ए रोल फॉर इंडिया, पन्ना शुक्ला, दिल्ली, २०११, पान १६५.
७.डॉ. बी. सिंह गहलौत, भारत की विदेश निती, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००६, पान २०५.
८.शशि शुक्ला, आंतराष्ट्रीय राजनिती, भारत प्रकाशन, लखनऊ, २००७, पान १६४.
९.ए. के. मिश्रा, दक्षिण एशिया एवं भारत का विकास, प्रिज्म बुक्स, जयपूर, २०१२, पान १७८.
१०.हिंदुस्थान टाईम्स्, २६ मे २०१४.
११.कृष्णकांत शुक्ल, भारत और एशियाई देश, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, २००६, पान १५०.
१२.बी. सी. नरुला, प्रमुख राष्ट्रों की विदेश निती, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१२, पान ३५१.
१३.आर. एस. यादव, भारती की विदेशी निती एक विश्लेषण, किताब महल डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली, २००२, पान ३२१.
१४.शशि शुक्ला, आंतराष्ट्रीय संघटन, भारत प्रकाशन लखनऊ, २००६, पान ३३१.
१५.नवभारत टाईम्स्, २ डिसेंबर २०१५.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net